# शौर्य मराठी

महाराष्ट्राचे निडर दैनिक

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com

जळगाव, धुळे, नंदुरबार | सोमवार , दि. १६ मार्च २०२६ | वर्ष २ रे | अंक १२४ किंमत : ५ रु. | पाने ४


## दिन विशेष...

१९५६ : नवप्रवर्तक कवी बा.सी.मर्ढेकर यांचे निधन झाले. ❋ राजपुतांच्या गृहिलोत वंशातील मेवाडचा राजा अमरसिंह यांचा जन्म झाला. ❋ सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश प्र.बा.गजेंद्रगडकर यांचा जन्म.

१९९६ : सज्यजित रॉय यांना ऑस्कर पारितोषिक प्रदान करण्यात आले.

सेन्सेक्स ७४,५६३.९२ -१,४७०.५० (१.९३%)

डॉलर ₹ ९२.३६

**आजचे तापमान** (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३८ | २१ |
| दिल्ली | ३० | १८ |
| मुंबई | ३४ | २३ |
| नागपूर | ३८ | २१ |
| पुणे | ३५ | १७ |

## सुविचार

आपल्या आयुष्यातील प्रत्येक अनुभव हा एक शिकवण आहे. त्यांच्याकडून शिकून, आपण आपल्या भविष्याचा आराखडा तयार करू शकतो.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:३६ संध्या-६:३७

**सोने – चांदी**

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,६२,०००/- २,७५,०००/-

# केंद्रीय निवडणूक आयोगाकडून ५ राज्यांच्या निवडणुकीची घोषणा

## बारामती, राहुरीतही पोटनिवडणूक जाहीर

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**केंद्रीय निवडणूक आयोगाकडून आज पत्रकार परिषद घेण्यात आली. या पत्रकार परिषदेत पाच राज्यांच्या निवडणुकांची घोषणा करण्यात आली. आसाम, पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू या चार राज्यांची आणि पदुच्चेरी या केंद्रशासित प्रदेशाच्या निवडणुकीचीदेखील घोषणा करण्यात आली आहे.**

तसेच महाराष्ट्रातील बारामती आणि राहुरी मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीचीदेखील घोषणा यावेळी करण्यात आली. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी पत्रकार परिषदेत निवडणुकांच्या तारखांची घोषणा केली. आसाम, केरळ आणि पदुच्चेरी या तीनही ठिकाणी एकाच दिवशी मतदान होणार आहे. तीनही ठिकाणी ९ एप्रिलला मतदान होईल. तर ४ मे ला निकाल जाहीर होतील. तामिळनाडूतही एकाच टप्प्यात निवडणूक होईल. तामिळनाडूमध्ये सर्व २३४ जागांसाठी २३ एप्रिलला मतदान होईल. तर ४ मे रोजी निकाल जाहीर होतील.

पश्चिम बंगालमध्ये दोन टप्प्यात मतदान पार पडेल. पहिल्या टप्प्यात १५२ जागांसाठी २३ एप्रिलला मतदान पार पडेल. तर दुसऱ्या टप्प्यात १४२ जागांसाठी २९ एप्रिलला मतदान पार पडेल. यानंतर ४ मे रोजी मतमोजणी होईल.

आसाममध्ये १२६ जागांसाठी एकाच टप्प्यात निवडणूक होईल. आसाममध्ये ९ एप्रिलला सर्व १२६




जागांसाठी मतदानाची प्रक्रिया पार पडेल. तर ४ मे रोजी निकाल जाहीर होतील. या निवडणुकीसाठी सर्व उमेदवार हे २३ एप्रिलपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करु शकणार आहेत. तर २६ एप्रिलला अर्ज मागे घेता येईल.




### ➤ बारामती आणि राहुरी मतदारसंघात पोटनिवडणुकीची घोषणा

या व्यतिरिक्त गोवा, गुजरात, कर्नाटक, महाराष्ट्र, नागालँड, त्रिपुरा राज्यातील पोटनिवडणुकांची देखील घोषणा करण्यात आली. महाराष्ट्रात राहुरी आणि बारामती या दोन मतदारसंघांसाठी पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. महाराष्ट्रातील बारामती आणि राहुल विधानसभा मतदारसंघासाठी २३ एप्रिलला मतदान होईल आणि ४ मे ला निकाल जाहीर होतील, असं निवडणूक आयोगाकडून जाहीर करण्यात आलं आहे. राहुरी आणि बारामतीच्या पोटनिवडणुकीसाठी उमेदवार ३० मार्च ते ६ एप्रिल २०२६ या काळात उमेदवारी अर्ज दाखल करु शकतात. तर ९ तारखेला अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख राहणार आहे. यानंतर २३ एप्रिलला मतदान पार पडेल. राहुरीचे दिवंगत आमदार शिवाजी कर्डिले यांचं १७ ऑक्टोबर २०२५ रोजी निधन झालं होतं. त्यामुळे राहुरीची जागा रिक्त आहे. तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधननंतर आता बारामती विधानसभेसाठी देखील पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. राहुरी आणि बारामतीत आता बिनविरोध निवडणूक होते का? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

### पोटनिवडणुकीचा असा असेल कार्यक्रम

- निवडणुकीसाठीची अधिसूचना : ३० मार्च २०२६
- उमेदवारी अर्ज दाखल : ६ एप्रिल २०२६
- अर्ज छाननी : ७ एप्रिल २०२६
- अर्ज मागे घेण्याची तारीख : ९ एप्रिल २०२६
- मतदान : २३ एप्रिल २०२६
- मतमोजणी : ४ मे २०२६

### बारामती आणि राहुरीची पोटनिवडणूक बिनविरोध होणार?

बारामती आणि राहुरी पोटनिवडणुकीबाबत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाचं भाष्य केलं. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, बारामती आणि राहुरी या दोन्ही पोटनिवडणुका या बिनविरोध व्हाव्यात, असा आमचा प्रयत्न असेल. पण आमच्यावर जर निवडणूक लादली गेली तर आम्हीही निवडणूक लढायला तयार आहोत, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

## थोडक्यात



### दक्षिण आफ्रिकेने काढला वचपा; न्यूझीलंडचा ९१ धावांत खुर्दा,

**माऊंट मांघनाई ।** टी वर्ल्डकप स्पर्धेच्या सेमी फायनलच्या लढतीत न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेचा धुव्वा उडवत दिमाखात फायनल गाठली होती. जिव्हारी लागणाऱ्या या पराभवाचा वचपा दक्षिण आफ्रिकेने अवघ्या आठवडाभरात घेतला आहे. माऊंट मांघनाई इथे झालेल्या लढतीत दक्षिण आफ्रिकेने न्यूझीलंडचा डाव ९१ धावांतच गुंडाळला. हे छोटेखानी लक्ष्य ३ विकेट्सच्या मोबदल्यात गाठत आफ्रिकेने बाजी मारली. दोन्ही संघांनी प्रमुख खेळाडूंना या मालिकेसाठी विश्रांती देण्याचा निर्णय घेतला आहे. न्यूझीलंडचा कर्णधार मिचेल सँटनर मालिकेतील पाचपैकी तीनच सामने खेळणार आहे.

### मुलाने मद्यधुंद अवस्थेत वडिलांची केली हत्या

**मेरठ ।** येथील सिव्हिल लाईन्स परिसरात दारू पिऊन झालेल्या भांडणानंतर मुलाने स्वत:च्या वडिलांना विटाने मारहाण केली. एवढंच नाही तर वडिलांना मारहाण केल्यानंतर या आरोपीने स्वतःचं मनगटही कापल्याचं सांगितलं जात आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आणि घटनेची माहिती पोलिसांपर्यंत पोहोचली. काही वेळाने पोलीस घटनास्थळी दाखल झाले. या प्रकरणात पोलिसांनी आरोपीला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे. ही घटना शुक्रवारी रात्री उशिरा घडल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.



### अखेर युद्ध थांबणार? इराणच्या परराष्ट्र मंत्र्यांचं वक्तव्य

**वाशिंग्टन ।** अमेरिका-इस्रायल हे संयुक्तपणे इराणवर हल्ले करत आहेत, तर इराणही प्रतिहल्ले करत आहे. त्यामुळे मध्य पूर्वेत तणाव निर्माण झालेला आहे. या तणावामुळे अनेक देशांना होणारा कच्च्या तेलचा पुरवठा विस्कळीत होत आहे. तसेच होर्मुझच्या सामुद्रधुनीतही तणावाची परिस्थितीमुळे कच्च्या तेलाचा व्यापार ठप्प होण्याच्या मार्गावर आहे. मात्र, असं असतानाच इराणच्या परराष्ट्र मंत्र्यांनी एक मोठं वक्तव्य करत हे युद्ध संपवण्याचे संकेत दिले आहेत.

# रेल्वेत लेखी परीक्षेशिवाय २८०१ जागांची भरती

● आयटीआय उत्तीर्णांना मोठी संधी!

प्रतिनिधी । जळगाव

**रेल्वेत नोकरीचे स्वप्न पाहणाऱ्या तरुणांसाठी दक्षिण-मध्य रेल्वेने मोठी संधी उपलब्ध करून दिली आहे. प्रशिक्षणार्थी (अप्रेंटिस) पदांसाठी तब्बल २८०१ जागांसाठी भरती प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.**

विशेष म्हणजे या भरतीसाठी उमेदवारांना कोणतीही लेखी परीक्षा द्यावी लागणार नाही. दहावी आणि आयटीआय उत्तीर्ण उमेदवारांची निवड थेट गुणवत्तेच्या आधारे करण्यात येणार असल्याने राज्यातील तसेच देशभरातील तांत्रिक शिक्षण घेतलेल्या तरुणांमध्ये



या भरतीबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

दक्षिण मध्य रेल्वेने प्रसिद्ध केलेल्या अधिकृत अधिसूचनेनुसार विविध तांत्रिक ट्रेडमध्ये प्रशिक्षणार्थी पदांसाठी ही भरती करण्यात येणार आहे. भारतीय रेल्वेच्या कार्यपद्धतीमध्ये तांत्रिक कौशल्याला मोठे महत्त्व असल्याने औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) शिक्षण घेतलेल्या उमेदवारांना या माध्यमातून रेल्वेच्या विविध विभागांमध्ये प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षणाच्या (पान २ वर)

# उत्तर महाराष्ट्रातील नार-पार नदीजोड प्रकल्पाला मंजुरी

## चाळीसगाव, भडगाव व एरंडोल तालुक्यातील ४२ हजार ५६० एकर जमीन सिंचनाखाली येणार

प्रतिनिधी । जळगाव

**उत्तर महाराष्ट्रातील नाशिक आणि जळगाव या जिल्ह्यांसाठी वरदान ठरणारा आणि गेल्या काही दशकांपासून प्रतीक्षेत असलेला नारपार गिरणा नदीजोड प्रकल्प आता प्रत्यक्ष साकारण्याच्या दिशेने मार्गस्थ होत आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत मंजुरी मिळालेल्या गिरणा डावा व उजवा कालवा तसेच मोसमसाळ कालव्याची क्षमतावाढ आणि स्ट्रक्चरल बांधकामाचे भूमिपूजन लवकरच केले जाणार आहे. या ऐतिहासिक सोहळ्याच्या नियोजनासाठी राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या पुढाकारातून शनिवारी बागलाण तालुक्यातील लखमापूर येथे शेतकऱ्यांची सहविचार सभा पार पडली.**



उत्तर महाराष्ट्रातील गिरणा, मोसम, बोरी आणि कान्होळी नदी खोरे परिसर हा वर्षानुवर्षे दुष्काळी पट्ट्यात मोडतो. या भागाची पाण्याची तहान भागवण्यासाठी पश्चिम वाहिनी नारपारऔरंगा नद्यांचे गुजरातमध्ये अरबी समुद्रात वाहून जाणारे पाणी गिरणा उपखोऱ्यात वळविण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून होत आहे.

मंत्री दादा भुसे यांनी हा प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केला. जनभावना आणि भुसे यांच्या पाठपुराव्याला अखेर यश आले असून, ५ सप्टेंबर २०२४ रोजी ७,४६५.२९ कोटी रुपये खर्चाच्या या प्रकल्पास शासनाने प्रशासकीय मान्यता दिली आहे. (पान २ वर)

# १६ वर्षांच्या मुलीवर एसएमबीटीत गुंतागुंतीची यकृत कर्करोग शस्त्रक्रिया यशस्वी

## कर्करोग शस्त्रक्रिया तज्ज्ञ डॉ. अंबरीश चॅटर्जी यांच्यासह टीमची यशस्वी कामगिरी

प्रतिनिधी । नाशिक

**एसएमबीटी हॉस्पिटलच्या एसएमबीटी कॅन्सर इन्स्टिट्यूटमध्ये नुकतीच १६ वर्षांच्या मुलीवर अतिशय क्लिष्ट आणि गुंतागुंतीची समजली जाणारी मोठ्या यकृतातील गाठीची (लिव्हर ट्यूमर) यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. ही शस्त्रक्रिया एसएमबीटी हॉस्पिटलचे कर्करोग शस्त्रक्रिया तज्ज्ञ (सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट) डॉ. अंबरिश चॅटर्जी यांच्यासह त्यांच्या टीमने यशस्वी केली. या कामगिरीमुळे डॉ. अंबरीश चॅटर्जी आणि संपूर्ण टीमचे सर्व स्तरातून कौतुक**



**होत आहे. या यशस्वी शस्त्रक्रीयेनंतर एसएमबीटी हॉस्पिटलमधील आधुनिक सुविधा व तज्ज्ञ डॉक्टरांची क्षमता पुन्हा एकदा अधोरेखित झाली**



**आहे.**

अधिक माहिती अशी की, १६ वर्षांची अस्मिता (नाव बदललेले) हिच्या यकृतामध्ये सुमारे १२X १०X१२ सें.मी. आकाराची मोठी गाठ आढळून आली होती. ज्यामध्ये यकृतचे २, ३ आणि ४ भाग समाविष्ट होते. बायोप्सी रिपोर्ट केल्यानंतर ही गाठ फोकल नोड्युलर हायपरप्लेशिया असल्याचे निष्पन्न झाले. गेल्या अनेक वर्षांपासून कुटुंबीय आणि डॉक्टर्स यांच्या निगराणीखाली ही रुग्ण होती. त्यानंतर, अलीकडेच लक्षणे (पान २ वर)

### ➤ मोठ्या शस्त्रक्रियांसाठी समन्वय महत्त्वाचा

यकृतासारख्या अवघड अवयवांवरील मोठ्या शस्त्रक्रिया यशस्वी होण्यासाठी अनेक विभागांचे समन्वयाने काम करणे अत्यंत आवश्यक असते. एसएमबीटी हॉस्पिटलमध्ये २६ पेक्षा अधिक स्पेशालिटी आणि सुपरस्पेशालिटी विभाग एकाच छताखाली कार्यरत असल्यामुळे आणि योग्य वेळी योग्य विभागाची मदत मिळाल्यामुळेचे ही शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडली.

**- डॉ. अंबरीश चॅटर्जी**
कर्करोग शस्त्रक्रिया तज्ज्ञ, एसएमबीटी हॉस्पिटल

### लवकरच पेट स्कॅन व रेडीएशन थेरपी

एसएमबीटीत मेडिकल ऑन्कोलॉजीस्ट डॉ. संदीप इशी, सर्जिकल ऑन्कोलॉजीस्ट डॉ. अंबरीश चॅटर्जी व डॉ. विनायक शेनगे, बालरोग कर्करोगतज्ञ डॉ. पिंकी शाह-काळे, तर हेमॅटो ऑन्कोलॉजीस्ट (ब्लड कॅन्सर) डॉ. गिरीश बदरखे सेवा देत आहेत. गेल्या वर्षभरात १५ पेक्षा अधिक बोन मॅरो ट्रान्सप्लांट आणि कार-टी सेल थेरपी याठिकाणी झाल्या. लवकरच अत्याधुनिक पेट स्कॅन आणि रेडिएशन थेरपी सुरू होणार आहे. यापुढे एसएमबीटी हॉस्पिटल हे सर्वसमावेशक कर्करोग केअर सेंटर म्हणून काम करेल.

**-सचिन बोरसे,**
सीओओ, एसएमबीटी हॉस्पिटल

### सिलिंडरचा दर अव्वाच्या सव्वा; नाश्ता-चहाच्या दुकानांचे शटर बंद

वृत्तसंस्था । छ.संभाजीनगर

व्यावसायिक सिलिंडरच्या तीव्र टंचाईमुळे छत्रपती संभाजीनगरमधील अधिकतर नाश्ता सेंटर्सची दुकाने बंद ठेवण्याची वेळ आली आहे. गुलमंडीवरील येवले चहाच्या दुकानाचे शटर दोन दिवसांपासून बंद दिसून येत आहे. इतर अनेक लहान-मोठे व्यावसायिकही जेमतेम एक-दोन दिवसच शिल्लक राहिलेल्या सिलिंडरच्या साठ्यावर तग धरून आहेत. त्यात खासगी सिलिंडरचे दरही दुप्पटच झाल्याने कमवायचे काय अन खायचे काय असा प्रश्न नाश्त्यातील व्यावसायिक उपस्थित करत असून, मार्चच्या मध्यातच सिलिंडरची तीव्र टंचाई म्हणजे आगीत आणखी एक संकटाची भर पडल्याने प्रतिक्रियातही भडका उडत असल्याचे चित्र आहे.

## संपादकीय

### जगावे की मरावे

प्रख्यात ब्रिटिश नाटककार विल्यम शेक्सपियर याने आपल्या लोकप्रिय 'हॅम्लेट' या नाटकामध्ये 'टू बी ऑर नॉट टू बी' म्हणजेच 'जगावे की मरावे हाच खरा प्रश्न आहे' हा संवाद लोकप्रिय केला. बुधवारी सर्वोच्च न्यायालयाने इच्छा मरणाबाबत एक लँडमार्क निकाल देताना शेक्सपियरच्या या नाटकाचा आणि या संवादाचा संदर्भ दिला आहे. हरियाणातील ३३ वर्षीय हरीश राणा या युवकाला पॅसिव्ह पद्धतीने इच्छामरण देण्यात यावे, अशी परवानगी सर्वोच्च न्यायालयाने दिल्यामुळे भारतातील हा पहिला निकाल ठरला आहे. २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयानेच आपल्या एका निकालामध्ये मरण हा मूलभूत हक्क असल्याचे मान्य केले होते. इच्छा मरणाबाबत गाइडलाइन्स तयार कराव्यात, असे आदेशही सरकारला दिले होते. पण त्यानंतर इच्छा मरणाबाबत सुप्रीम कोर्टाने किंवा अन्य कोणत्याही न्यायालयाने अशा प्रकारचा निकाल दिला नव्हता. पण या केसमध्ये मात्र सर्वोच्च न्यायालयाने हरीश राणा याचे सर्व वैद्यकीय उपचार थांबवून त्याला एक शांत मरण द्यावे, असे सुचवले आहे. वयाच्या विसाव्या वर्षी शिक्षण घेत असताना इमारतीच्या चौथ्या मजल्यावरून पडून ब्रेन डेड झालेल्या हरीश राणावर गेल्या १३ वर्षांपासून उपचार सुरू होते. त्याचे वयोवृद्ध आई–वडील त्याची संपूर्णपणे काळजी घेत होते. पण त्याच्या प्रकृतीत कोणतीही सुधारणा होत नव्हती. नाका तोंडाला नळ्या लावूनच त्याच्या आहाराची काळजी घेतली जात होती. हरीशवर अजून कितीही उपचार केले तरी त्याच्या प्रकृतीत कोणतीही सुधारणा होणार नाही, अशा प्रकारचा अहवाल मेडिकल बोर्डाकडून आल्याने आणि हरीशच्या आई–वडिलांनीच इच्छा मरणाला परवानगी देण्याची मागणी केल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने सर्व गोष्टींचा विचार करून हा महत्त्वपूर्ण निकाल दिला आहे. या निकालाच्या निमित्ताने केंद्र सरकारने पॅसिव्ह युथेनेशिया म्हणजेच पॅसिव्ह पद्धतीचे इच्छामरण देणे याबाबत आणखी काही मार्गदर्शक तत्त्वे तयार करावीत, असेही सांगितले आहे. रुग्णावर उपचार करणाऱ्या कोणत्याही डॉक्टरचे प्रथम ध्येय जरी रुग्णाचा जीव वाचवणे हेच असले तरी, डॉक्टर जे उपचार करत आहेत त्याचा फायदा होणार नसेल तर काय करावे हा प्रश्न नेहमीच निर्माण होतो. हरीशला १३ वर्षे अशाच प्रकारे जगवले जात होते. खरं तर शेक्सपियरने म्हटल्याप्रमाणे अशा रुग्णांबाबतच नेहमी 'जगावे का मरावे' हा प्रश्न निर्माण होत असतो. त्याच्या जवळच्या नातेवाईकांना या आपल्या रुग्णाविषयी कितीही काळजी वाटत असली तरी त्याची एकदा सुटका व्हावी असेही त्यांना वाटत असते. रुग्णाने दुःखात जगावे की शांतपणे मरावे हा प्रश्न त्याच्या नातलगानाच पडलेला असतो. या प्रकरणामध्येही हरीश राणाच्या आई–वडिलांनीच पुढाकार घेऊन इच्छामरणाची मागणी केल्यामुळे सर्वोच्च न्यायालयाला हा महत्त्वाचा निर्णय द्यावा लागला. रुग्णाचे सर्वोच्च हित हा एकमेव विषय समोर ठेवून सर्वोच्च न्यायालय निर्णय घेत आहे असे निकाल पत्रात न्यायालयाने म्हटले आहे. म्हणजेच जर एखाद्या रुग्णाची प्रकृती सुधारण्याची शक्यता असेल तर त्याला कधीच इच्छामरणाला परवानगी दिली जाणार नाही. पण उपचाराला अजिबात प्रतिसाद मिळत नसेल तर लाइफ सपोर्ट सिस्टीम काढून घेऊन आणि वैद्यकीय उपचार थांबून अशा रुग्णाला शांतपणे मरण्याची परवानगी दिली जाऊ शकते, असे सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकाल पत्रात सुचवले आहे.

# धुळ्यात मेडिकल व रद्दी दुकानाला आग





प्रतिनिधी । धुळे

## ५० लाखांचे नुकसान

**शहरातील चाळीसगाव रोडवरील सूर्या जीम परिसरात पहाटे लागलेल्या भीषण आगीत मेडिकल व रद्दीच्या दुकानाचे मोठे नुकसान झाले. या आगीत सुमारे ५० ते ६० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.**

आग आटोक्यात आणण्यासाठी महापालिकेचे पाच अग्निशामक बंब घटनास्थळी दाखल झाले होते. चाळीसगाव रोडवर पवन नगरातील मयूर गायकवाड यांचे नंदिनी मेडिकल व होलसेल मेडिकल एजन्सी नावाचे दुकान आहे. या दुकानाला पहाटे सुमारे ३ वाजेच्या सुमारास शॉर्टसर्किटमुळे आग लागली. आगीने काही वेळातच भीषण रूप धारण केल्याने दुकानातील फर्निचर, फ्रिज तसेच होलसेल व रिटेलसाठी साठवून ठेवलेली मोठ्या प्रमाणातील औषधे जळून खाक झाली. या घटनेत मेडिकल दुकानाचे सुमारे ३० ते ३५ लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. दरम्यान, मेडिकल दुकानालगत भटू कदम यांचे शिवसागर वेस्ट पेपर पुठ्ठा खरेदी केंद्र आहे. त्यालाही आगीची झळ बसली. आगीच्या भडक्यामुळे तेथील मोठ्याप्रमाणात रद्दी व पुठ्ठे जळून खाक झाले असून त्यात सुमारे १० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे. पहाटे नमाज पठणासाठी उठलेल्या समोर राहणाऱ्या नागरिकांना आगीचे लोळ दिसून आले. त्यांनी तातडीने कदम यांना माहिती दिली. कदम यांनी घटनास्थळी दाखल होत अग्निशामन विभागाला कळविले. तोपर्यंत त्यांच्यासह परिसरातील पंडीत मुलमुले, पवन बडके, विपुल रावळे, लोकेश चौधरी, अक्षय लाडे, अभिषेक कदम, महेश कदम, राकेश लोके, संजय पाटील, दाऊद खाटीक, संभाजी चौधरी व नमाज पठणासाठी जाणाऱ्या युवकांनी बोअरच्या नळीने पाणी टाकत आग विझवण्याचा प्रयत्न केला. काही वेळातच महापालिकेचे पाच अग्निशामक बंब घटनास्थळी दाखल झाले. अग्निशामक दलाने आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. मात्र आगीची तीव्रता अधिक असल्याने सकाळी सुमारे ६ वाजेपर्यंत आग धुमसत होती. या घटनेमुळे परिसरात काहीकाळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी दोन्ही दुकानांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. प्राथमिक तपासात शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

# उपक्रमशील शिक्षक गजानन लांबर्डे यांचे नवोपक्रम स्पर्धेत यश

प्रतिनिधी । शिरपूर

**नवोपक्रम स्पर्धेत प्राथमिक गटातून आर. सी. पटेल अनुदानित प्राथमिक आश्रमशाळा निमझरी येथील उपक्रमशील शिक्षक गजानन लांबर्डे यांनी उत्कृष्ट कामगिरी करत जिल्हास्तरावर चौथा क्रमांक पटकावला. महाराष्ट्र शासनाच्या राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय नवोपक्रम स्पर्धेचा पारितोषिक वितरण कार्यक्रम नुकताच संपन्न झाला.**

या यशाबद्दल त्यांना जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे यांच्या प्राचार्या डॉ. जयश्री पाटील यांच्या हस्ते प्रमाणपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. पारितोषिक वितरण समारंभाला वरिष्ठ अधिव्याख्याता जे. एस. पाटील, नवोपक्रम विभाग प्रमुख तथा अधिव्याख्याता डॉ. वनमाला पवार, अधिव्याख्याता डॉ. बी. आर. पाटील, नवोपक्रम स्पर्धेचे परीक्षक तसेच सहयोगी प्राध्यापिका डॉ. योगिता बारी आदी मान्यवर उपस्थित होते. या उल्लेखनीय यशाबद्दल शिरपूर एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष माजी मंत्री आमदार अमरिशभाई पटेल, कार्याध्यक्ष भूपेशभाई पटेल, नगराध्यक्ष चिंतनभाई पटेल, उपाध्यक्ष राजगोपाल भंडारी, सचिव रेषा पटेल, सर्व संचालक, संस्थेचे सीईओ डॉ. उमेश शर्मा, मुख्याध्यापक जी.एम.पाटील, माध्यमिक विभागाचे प्राचार्य पी. पी. चव्हाण, सर्व शिक्षक, कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



# चाळीसगाव महाविद्यालयात महिला दिन साजरा



प्रतिनिधी । चाळीसगाव

शहरातील बी.पी.आर्ट्स, एस. एम. ए. सायन्स अँड के. के.सी कॉमर्स कॉलेज आणि के.आर.कोतकर ज्युनिअर कॉलेज चाळीसगाव येथे दि.११ मार्च रोजी जागतिक महिला दिन अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील महिला प्राध्यापक यांच्या बरोबरच प्राध्यापक आणि कर्मचाऱ्यांच्या माता व सौभाग्यवती यांचा विशेष गौरव करण्यात आला. यावेळी त्यांना सन्मानपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. या गौरव सोहळ्यात सुरुवातीला राजमाता जिजाऊ आणि स्त्रीशिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करण्यात आले. यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग व सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# दोंडाईचातील राऊळ नगरातील घरफोडीचा छडा

प्रतिनिधी । धुळे

**दोंडाईचा येथील राऊळ नगरातील घरफोडीचा स्थानिक गुन्हे शाखेने छडा लावत चोरट्यास शिताफीने जेरबंद केले. त्याच्याकडून गुन्ह्यातील १८ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले. दोंडाईचा शहरातील राऊळ नगर, संतोषी माता मंदिराजवळ राहणाऱ्या ओमप्रकाश पंडित सोनवणे यांच्या राहत्या घरात दि. २९ सप्टेंबर २०२५ रोजी सायंकाळी ४ ते रात्री ८.३० वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने घरफोडी केली होती.**



या घरफोडीत सुमारे ४७ हजार रुपये किमतीचे सोने–चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरीस गेली होती. याप्रकरणी दोंडाईचा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखा करत असताना काल दि.१३ मार्च रोजी पोलिसांना गोपनीय माहिती मिळाली की, या घरफोडीचा आरोपी चोरीचा मुद्देमाल विक्री करण्यासाठी दोंडाईचा येथील नंदुरबार चौफुली परिसरात उभा आहे. मिळालेल्या माहितीनुसार पोलिस पथकाने तात्काळ सापळा रचून संशयित राजगुरु मोहन पाटील (वय २०, रा. महादेवपुरा, दोंडाईचा ता. शिंदखेडा) यास ताब्यात घेतले. सखोल चौकशीत त्याने घरफोडी केल्याची कबुली दिली. त्याच्याकडून १८ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यात सुमारे २.५१० ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र, नथ, ३.६० ग्रॅम वजनाच्या एअर रिंग तसेच पिवळ्या धातूचे पेंडल असा दागिन्यांचा समावेश आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे व अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्रीराम पवार, श्रीकृष्ण पारधी यांनी केली.

## पान १ वरुन

### उत्तर महाराष्ट्रातील नार–पार......

१.२३ लाख एकर जमीन सिंचनाखाली येणार – या प्रकल्पामुळे नाशिक आणि जळगाव जिल्ह्यातील शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा सुटण्यास मदत होणार आहे. या योजनेद्वारे नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा, कळवण, सटाणा, मालेगाव व देवळा परिसरातील सुमारे ८१,२३० एकर क्षेत्र ओलिताखाली येईल. तसेच जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव, भडगाव व एरंडोल तालुक्यातील ४२,५६० एकर जमीन सिंचनाखाली येईल. अशा प्रकारे दोन्ही जिल्ह्यांतील एकूण १ लाख २३ हजार ७९० एकर क्षेत्राला हक्काचे पाणी उपलब्ध होणार आहे. यामुळे शेतीसह पिण्याचा आणि उद्योगांचा पाणीप्रश्न निकाली निघणार आहे. नार–पार प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात १० हजार ६४० दशलक्ष घनफूट पाणी गिरणा खोऱ्यात वळविण्यात येणार आहे. त्यासाठी सुरगाणा तालुक्यात होणाऱ्या सुमारे ४,११६ कोटी रुपयांच्या प्रमुख कामांची निविदा प्रक्रिया सध्या अंतिम टप्प्यात आहे. दुसऱ्या टप्प्यात सुमारे २० हजार दशलक्ष घनफूट पाणी उपलब्ध करण्याबाबतचा अभ्यास देखील शासन स्तरावर सुरू आहे. जवळपास १५ तालुक्यांसाठी लाभदायक ठरणारा हा प्रकल्प मंत्री दादा भुसे यांच्या कार्यकाळातील एक मैलाचा दगड ठरणार असून, यामुळे नाशिक व जळगाव जिल्ह्याच्या लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी मोठी मदत होणार आहे. भूमिपूजन सोहळ्याची जय्यत तयारी – प्रकल्पांतर्गत मालेगाव व सटाणा तालुक्यातील कालव्यांची क्षमतावाढ आणि स्ट्रक्चरल बांधकामाच्या कामांना लवकरच प्रारंभ होणार आहे. हा भूमिपूजन सोहळा धुमधडाक्यात करण्याचा मंत्री भुसे व त्यांच्या समर्थकांचा प्रयत्न आहे.

### १६ वर्षांच्या मुलीवर......

आढळून आल्यामुळे कुटुंबियांशी चर्चा करून शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे डॉ चॅटर्जी यांनी सांगितले. हि शस्त्रक्रिया अतिशय क्लिष्ट आणि अवघड स्वरुपाची होती. शिवाय गुंतागुंत अधिक असल्यामुळे येथील शस्त्रक्रियातज्ञ आणि भूलतज्ञ यांच्यासाठी अधिक आव्हानात्मकदेखील होती. एसएमबीटी हॉस्पिटलचा मुंबईतील टाटा मेमोरियल हॉस्पिटलसोबत गेल्या तीन वर्षांपासून तांत्रिक मार्गदर्शनाचा करार आहे. त्यामुळे याठिकाणी उपलब्ध असलेले तज्ञदेखील टाटा मेमोरियल हॉस्पिटलमधून शिक्षण किंवा प्रशिक्षण घेतलेले आहेत. डॉ. अंबरीश चॅटर्जी यांनी देखील याच ठिकाणी शिक्षण घेऊन नाशिकमध्ये तब्बल १० वर्षांपेक्षा अधिक काळ सेवा देत आहेत. ते एसएमबीटीमध्ये असल्यामुळे आंतरराष्ट्रीय दर्जाचे उपचार एसएमबीटीत करणे शक्य झाले आहे. डॉ. चॅटर्जी यांनी सांगितले की, लहान वयात ट्यूमर किंवा इतर गंभीर आजार आढळण्यामागे अनुवांशिक कारणे, बदलती जीवनशैली, अयोग्य आहार, पर्यावरणीय प्रदूषण आणि ताणतणाव ही कारणे असू शकतात. आधुनिक तपासणी तंत्रज्ञानामुळे आजारांचे निदान लवकर होत असून उपचार तत्काळ सुरु करण्यास प्रारंभ झाला आहे. शरीरात यकृत आणि हृदय हे अतिशय जवळ–जवळ असते. यामुळे शरीरात रक्त संक्रमण करणाऱ्या सर्व लहान मोठ्या धमन्या या भागात असल्याने अधिक रक्तस्राव होतो. खूप बारकाईने या शस्त्रक्रिया केल्या जातात. या शस्त्रक्रीयेसाठीही तब्बल १२ तासांपेक्षा अधिक वेळ लागला. डॉ. चॅटर्जी यांनी रुग्णावर लेफ्ट हेपॅटेक्टॉमी मोठी शस्त्रक्रिया करून यकृतातील प्रभावित भाग (सेगमेंट २, ३ आणि ४) काढून टाकला. शस्त्रक्रिया दरम्यान आणि शस्त्रक्रियेनंतर रुग्णाची प्रकृती स्थिर होती. रुग्णाची प्रकृती समाधानकारक असून रुग्णालयातून सुट्टी देण्यात आली आहे. बोन मॅरो ट्रान्सप्लांट, कार–टी सेल थेरपी, बाल–कर्करोग तपासणी व उपचार याठिकाणी पूर्णवेळ केले जातात.

### रेल्वेत लेखी परीक्षेशिवाय......

काळात उमेदवारांना संबंधित कामकाजाची सविस्तर माहिती, उपकरणांचा वापर, तांत्रिक प्रक्रिया आणि कामातील शिस्त याबाबत अनुभव मिळणार आहे. या भरतीसाठी पात्रता निकषही स्पष्ट करण्यात आले आहेत. अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी मान्यताप्राप्त शिक्षण मंडळातून किमान ५० टक्के गुणांसह दहावी उत्तीर्ण केलेली असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर संबंधित ट्रेडमध्ये एनसीव्हीटी किंवा एससीव्हीटी मान्यताप्राप्त आयटीआय प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे. या दोन्ही शैक्षणिक पात्रतेच्या आधारे उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार केली जाणार आहे. ही कागदपत्रे सादर करणे आवश्यक – दहावी आणि आयटीआयमध्ये मिळालेल्या गुणांच्या टक्केवारीचा विचार करून अंतिम निवड प्रक्रिया पार पडणार असल्याचे रेल्वे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# शहादा येथे डाएटतर्फे कार्यशाळा

प्रतिनिधी । शहादा

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतर्फे तालुकास्तरीय व्यावसायिक शिक्षण व मार्गदर्शन दोन दिवसीय कार्यशाळा येथील एस. ए. मिशन. इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेचे उद्घाटन शहादा तालुका पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी डॉ. योगेश सावळे यांच्या मार्गदर्शनाखाली माधवराव मोरे व डायटचे विषय सहाय्यक देवेंद्र बोरसे यांनी केले. कार्यक्रमाचा अध्यक्षस्थानी एस.ए. मिशन हायस्कूलच्या प्राचार्या श्रीमती नाथानी होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष जगदीश पटेल उपस्थित होते. कार्यशाळेत सुलभक म्हणून मयुर पटेल, आर.बी. निकम, विजयसिंग ठाकूर, नितीन ठाकरे, संजय निकुंभे उपस्थित होते. यासोबत तालुक्यातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक व शिक्षक प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सावदा पोलीस निरीक्षकांविरुध्द हक्कभंग

## आ. एकनाथराव खडसेंची सूचना सभापतींनी स्वीकारली

प्रतिनिधी । जळगाव

**जिल्ह्यातील सावदा पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल पाटील यांनी लोकप्रतिनिधींशी उद्धट वर्तन केल्याप्रकरणी आता विधान परिषदेत गाजणार आहे.**

आ. एकनाथराव खडसे यांनी मांडलेली विशेषाधिकार भंगाची सूचना सभापतींनी स्वीकारली आहे. या प्रकरणाची आता लवकरच अधिकृत चौकशी होणार आहे. रावेर तालुक्यातील तासखेडा शिवारात हतनूर कालव्याच्या मातीची अवैध चोरी झाल्याचा प्रश्न आ. खडसे यांनी तारांकित प्रश्नाद्वारे सभागृहात उपस्थित केला होता. याप्रकरणी ४५६५ ब्रास मातीची चोरी झाल्याचे शासनाने मान्य करूनही, पोलिसांनी कोणतीही ठोस कारवाई केली नव्हती. या प्रकरणाचा पाठपुरावा करण्यासाठी आमदार खडसे ११ फेब्रुवारी २०२६ रोजी सावदा पोलीस स्टेशनला गेले असता, सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल पाटील यांनी त्यांना अपमानास्पद वागणूक दिल्याचा आरोप पत्रात करण्यात आला आहे. तपास सुरू आहे, तुमचा हस्तक्षेप नको, असे मोठ्या आवाजात ओरडून सांगत, लोकप्रतिनिधींना सन्मानाची वागणूक देण्याच्या शासन निर्णयाचे उल्लंघन केल्याचे खडसे यांनी म्हटले आहे. इतकेच नव्हे तर, खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी देऊन आपल्या दीर्घ राजकीय कारकिर्दीतील सामाजिक व राजकीय प्रतिष्ठा मलीन करण्याचा प्रयत्न केल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन सभापतींनी ही सूचना मान्य केली आहे.

हे प्रकरण आता विधान परिषद विशेषाधिकार समितीकडे चौकशीसाठी सोपवण्यात येणार आहे.

# महिलांचे आरोग्य ही कुटुंबाच्या आणि समाजाच्या प्रगतीची गुरुकिल्ली: प्रीती पाटील

प्रतिनिधी । नंदुरबार

**दरोजच्या धकाधकीच्या जीवनात कुटुंबाची काळजी घेत असताना महिलांचे स्वतःच्या आरोग्याकडे अनेकदा दुर्लक्ष होते. मात्र महिलांचे आरोग्य ही कुटुंबाच्या आणि समाजाच्या प्रगतीची गुरुकिल्ली आहे. त्यामुळे महिलांनी आपल्या आरोग्याकडे लक्ष देणे अत्यंत आवश्यक असून अशा उपक्रम ामुळे महिलांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता वाढण्यास मोठी मदत होते, असे प्रतिपादन विकास प्रतिष्ठानचे अध्यक्षा प्रिती पाटील यांनी केले.**



जागतिक महिला दिनानिमित्त जायंट्स ग्रुप ऑफ शहादा सहेली व संकल्प नारी ग्रुप यांच्या संयुक्त विद्यम ाने महिलांसाठी महावीर हॉस्पिटल मध्ये जायंट्स सहेली डॉ. स्मिता जैन यांच्यातर्फे महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी व उपचार शिबिर घेण्यात आले. शिबिराचे उद्घाटन विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा प्रीती पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी त्या बोलत होत्या.

यावेळी जायंट्स अध्यक्षा रेखा पटेल, जायंट्स सहेली आशा चौधरी, योगिता वाल्हे, अल्का जोंधळे, पूनम सोनार, जायंट्स फेडरेशन दोन अ चे कोषाध्यक्ष मानक चौधरी, जायंट्स अध्यक्ष भरत पटेल, संकल्प नारी ग्रुपचा अध्यक्षा राधिका सोनार, नगरसेविका, भारती चव्हाण, मोना कोचर, पुनम सोनार संकल्प ग्रुपचे सदस्य राकेश कोचर उपस्थित होते. याप्रसंगी प्रिती पाटील, डॉ. स्मिता जैन, डॉ. राजेश जैन यांना पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

७० महिला रुग्णांची तपासणी या शिबिरात एकूण ७० रुग्णांची मोफत तपासणी व उपचार करून संकल्प ग्रुपचे सदस्य राकेश कोचर यांच्या यश मेडिकलतर्फे मोफत औषधे देण्यात देण्यात आली. राधेय लॅबचे डॉ. संदीप पाटील यांनी मोफत रक्त तपासणी केली. महावीर हॉस्पिटल चे सर्व परिचारिका यांचे सहकार्य लाभले. जायंट्स अध्यक्षा रेखा पटेल यांनी सूत्रसंचलन केले. फेडरेशन टू अचे कोषाध्यक्ष मानक चौधरी यांनी आभार मानले.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक – सागर काशिनाथ ओतारी (मोबा.– ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी –३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव –४२५००१ येथे छापून शॉप नं. ई–१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव– ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
✻ कार्यकारी संपादक – किशोर शंकर शिंपी (✻ पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७–२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# पक्षाने दिलेली ओळख आपण कधीही विसरू नका : आ. सुरेश भोळे

## पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियानाचे उद्घाटन उत्साहात

प्रतिनिधी । जळगाव

**पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियान २०२६ मंडल प्रशिक्षण वर्ग दि. १४ व १५ मार्च हे दोन दिवशीय शिबीर भारत रत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह आर्यन फॉर्म शिरसोली रोड, जळगाव येथे सायंकाळी ५:३० सुरु झाले.शिबिराचे उद्घाटन केशवस्मृती प्रतिष्ठानचे भरत अमळकर यांनी केले.**

प्रास्ताविक संयोजक, दीपक परदेशी यांनी केले. सर्वप्रथम भारत माता, डॉ श्यामाप्रसाद, पंडित दीनदयाल यांच्या प्रतिमेचे पूजन केले व त्यानंतर संपूर्ण वंदे मातरम् गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. वर्गाला आ. राजूमामा भोळे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, भाजपा सर्वसामान्य कार्यकर्त्यांचा पक्ष




असून सर्वसामान्य कार्यकर्ताच पक्षाचा सर्वोच्च नेता बनू शकतो हे आपण पाहिले आहे. कार्यकर्त्यांमुळेच भाजपा हा देशात नव्हे तर संपूर्ण जगात एक नंबरचा पक्ष झालेला आहे. आजच्या या प्रशिक्षण वर्गामध्ये आपण सर्वांनी सहभागी होऊन आपापल्या मंडळात भाजपच्या केंद्र व राज्य सरकारच्या योजनांची माहिती द्यायची आहे.

पंडित दीनदयाल उपाध्याय यांनी जनतेच्या सर्वात शेवटच्या व्यक्तीपर्यंत अंतोदयाच्या माध्यमातून मोठा संदेश दिलेला आहे. त्यांच्याच माध्यमातून आजचा अभ्यास वर्ग आपण घेत आहोत. ते त्यांनी याप्रसंगी सांगितले. यानंतर 'बेटी बचाव बेटी पढाव'चे डॉ. राजेंद्र फडके यांनी सुद्धा मनोगत व्यक्त केले. व्यासपीठावर जिल्हाध्यक्ष दिलीप सूर्यवंशी, महापौर दीपमाला काळे, स्थायी समिती सभापती डॉ चंद्रशेखर पाटील, प्रदेश चिटणीस, भैरवी वाघ, डॉ राजेंद्र फडके, अविनाश पाटील, उदय भालेराव, नितीन लड्ढा, वक्ते महेश गोरडे, सुरेश कुलकर्णी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहित सोनवणे यांनी केले. शिबिरामध्ये पाच मंडलांमध्ये ७ सत्रे झाली या शिबिरामध्ये वक्ते म्हणून महेश गोरडे दीपक सूर्यवंशी भैरवीताई वाघ, सुरेश जी कुलकर्णी, निलेश झोपे, उद्याची भालेराव , मुकुंद मेटकर, यांनी प्रशिक्षण वर्गाला संबोधित केले या प्रशिक्षण वर्गासाठी जिल्हा सरचिटणीस विशाल त्रिपाठी, राहुल वाघ, नितीन इंगळे जयेश भावसार ,मंडळ अध्यक्ष आनंद सपकाळे, दिपमाला काळे, अजित राणे, विनोद मराठे, अतुल बारी, यांनी परिश्रम घेतले.

# नवीपेठेतून भरदिवसा रिक्षाचालकाची ४५ हजारांची रोकड लंपास

प्रतिनिधी । जळगाव

**शहरातील गजबजलेल्या नवीपेठ परिसरातून एका रिक्षाचालकाची ४५ हजार रुपयांची रोकड असलेली पिशवी अज्ञात चोरट्याने लांबवल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी जळगाव शहर पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



कुसुंबा खुर्द येथील रहिवासी आणि व्यवसायने रिक्षाचालक असलेले शुभम प्रकाशचंद राठी (वय ३१) हे १३ मार्च रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास नवीपेठ भागातील एथर शोरूमजवळ थांबले होते. यावेळी त्यांच्या जवळील निळ्या रंगाच्या कापडी पिशवीत एकूण ४५ हजार रुपयांची रोकड होती. अज्ञात चोरट्याने राठी यांची नजर चुकवून ही पिशवी लंपास केली. एकूण ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला आहे.

या घटनेनंतर शुभम राठी यांनी १४ मार्च रोजी जळगाव शहर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहराचे पोलीस निरीक्षक सागर शिंपी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल दीपक शिरसाठ या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

**● भरदिवसा झालेल्या या चोरीमुळे परिसरात खळबळ उडाली असून, नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.**

## थोडक्यात

### ज्वारीवर अळीचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कृषी विभागाची उपाययोजना

**पारोळा ।** तालुक्यातील काही भागांमध्ये ज्वारी पिकावर अळीचा प्रादुर्भाव वाढत असल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर धुळपिंप्री येथील शेतकरी मधुकर पाटील यांच्यासह इतर शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

शेतकऱ्यांच्या मागणीची दखल घेत कृषी विज्ञान केंद्र, जळगाव येथील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. हेमंत बाहेती तसेच तालुका कृषी अधिकारी दीपक आहेर आणि कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रादुर्भावग्रस्त शेतांची प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणीदरम्यान अधिकाऱ्यांनी अळीच्या प्रादुर्भावावर नियंत्रण मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना विविध उपाययोजनांबाबत मार्गदर्शन केले.

### प्रांतपाल ज्ञानेश्वर शेवाळे यांची क्बलला भेट

**पाचोरा ।** रोटरी इंटरनॅशनलच्या मयुनाइट फॉर गुडफ या थीमला साजेसे काम रोटरी क्लब पाचोरा-भडगाव यांनी केले असून, याबाबत प्रांतापाल ज्ञानेश्वर शेवाळे यांनी क्लबला भेट देऊन कौतुक केले. या भेटीदरम्यान क्लबच्या विविध उपक्रमांचा आणि योगदानाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. ज्ञानेश्वर शेवाळे यांनी या भेटीत क्लबच्या यशाचा उल्लेख करत १००० नवीन रोटरी सदस्य, ३० नवीन क्लब, १० लाख डॉलरचे भरीव आर्थिक योगदान, ५०८६ बॉटल रक्तसंकलन, तसेच रोटरी क्लब पाचोरा-भडगाव यांनी बनविलेला महा रांगोळीचा जागतिक रेकॉर्ड यासारख्या महत्त्वाच्या उपक्रमांचा गौरव केला.

# बहिणाबाई विद्यालयात गणित दिन साजरा



प्रतिनिधी । जळगाव

**विद्यार्थ्यांमध्ये गणिताविषयी गोडी निर्माण करणे तार्किक विचारशक्ती विकसित करणे आणि गणित हे दैनंदिन जीवनाशी निगडित आहे ही जाणीव निर्माण करणे हा या उपक्रमाच्या मुख्य उद्देश होता, असे डॉ. विलास नारखेडे यांनी या उपक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.**

यावेळी विद्यालयाचे समन्वय प्रतिभा खडके, संतोष पाटील, विशाल पाटील, अजय कुवर , यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिक्षकांनी रामानुजन व आईन्स्टाईन या शास्त्रज्ञाचे जीवन कार्य सांगून त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकून प्रतिकूल परिस्थितीत गणिताच्या क्षेत्रात केलेली अद्वितीय कामगिरी सांगितल्याने विद्यार्थ्यांचे मनोबल वाढले. अर्पण व पवन ट्रस्ट यांनी उपलब्ध करून दिलेल्या विद्यार्थ्यांना विविध आकारातून गुणाकार, भागाकार, बेरीज वजाबाकी तसेच त्रिकोण, चौकोन दंडगोल, शंख अशा भौमितिक आकाराबरोबर गणितातील खास संख्या, पाय तसेच गणिती खेळ जलद गणना व दैनंदिन जीवनातील गणितीय उदाहरणे, गणितातील कोडी फलकावर स्पष्ट करून दाखवली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमधील भीती कमी होऊन आत्मविश्वास वाढल्याचे दिसून आले. कार्यक्रमाचे शेवटी गणित विषयाचे महत्त्व विशद करीत गणित म्हणजे फक्त आकड्यांचा खेळ नसून विचार करण्याची शिस्त हा संदेश डॉ.विलास नारखेडे व राजेश वाणी यांनी विद्यार्थ्यांना दिला.

# पाचोरा येथे भाजपा प्रशिक्षण महाअभियानाची उत्साहात सांगता

प्रतिनिधी । पाचोरा

**भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या वैचारिक बळकटीसाठी आणि संघटनात्मक सक्षमीकरणासाठी आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय पंडित दीनदयाल उपाध्याय प्रशिक्षण महाअभियानाची आज उत्साहपूर्ण वातावरणात सांगता झाली. निर्मल इंटरनॅशनल स्कूल, पुनगाव रोड येथे पार पडलेल्या या प्रशिक्षण शिबिरात नगरदेवळा व पिंपळगाव मंडळातील कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पक्षविचार अधिक दृढ करण्याचा संकल्प व्यक्त केला.**



दुसऱ्या दिवशीच्या सत्रात मार्गदर्शन करताना ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज जळकेकर यांनी भारतीय जनता पक्षाचा इतिहास अत्यंत सखोल व प्रभावी पद्धतीने उलगडून सांगितला. भारतीय जनता पक्ष हा केवळ राजकीय पक्ष नसून राष्ट्रनिष्ठ विचारसरणी आणि दूरदृष्टी असलेले संघटन आहे. भविष्यातील भारत घडविण्याचा स्पष्ट वैचारिक दृष्टिकोन पक्षासमोर असून त्याच दिशेने कार्यकर्त्यांनी कार्य करावे, असे त्यांनी आपल्या मार्गदर्शनात नमूद केले.

त्यानंतर झालेल्या सत्रात भाजपा नेत्या मा. वैशालीताई सुर्यवंशी यांनी अंत्योदयातील संपृक्तता या महत्त्वपूर्ण विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. केंद्रातील भाजपा सरकार तसेच महाराष्ट्रातील युती सरकार समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विविध कल्याणकारी योजना पोहोचविण्याच्या उद्देशाने सातत्याने प्रयत्नशील आहे. शासनाच्या योजनांचा लाभ प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत पोहोचवणे हीच खरी अंत्योदयाची संकल्पना असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यकर्त्यांनी शासनाच्या योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवून समाजातील वंचित घटकांपर्यंत विकासाचा प्रवाह नेण्याचे कार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले.

दोन दिवस चाललेल्या या प्रशिक्षण महाअभियानात पक्षाचा इतिहास, संघटनात्मक कार्यपद्धती, वैचारिक अधिष्ठान, सोशल मीडिया व नमो पचा प्रभावी वापर, बूथ व्यवस्थापन तसेच अंत्योदयाची संकल्पना अशा विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. या माध्यमातून कार्यकर्त्यांना पक्षविचारांची नव्याने ओळख मिळाली तसेच संघटन अधिक सक्षम करण्यासाठी प्रेरणा मिळाली.

या कार्यक्रमाला सुभाष पाटील, गोविंद शेलार, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष सौ. अर्चनाताई पाटील व सविताताई शेळके तसेच भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दोन दिवस चाललेल्या या प्रशिक्षण शिबिरामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून पक्षाची विचारधारा समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्याचा निर्धार उपस्थित कार्यकर्त्यांनी व्यक्त केला. संघटन अधिक सक्षम, सजग आणि जनतेशी अधिक दृढपणे जोडण्यासाठी हा प्रशिक्षण उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

# आदिवासी कोळी समाज वधू-वर परिचय सूचीचे प्रकाशन

प्रतिनिधी । जळगाव

**जळगाव जिल्हा कोळी जमात विकास मंचच्या माध्यमातून रणरागिनी ग्रुप आयोजित आदिवासी कोळी जमातीचा राज्यस्तरीय उपवर वधू-वर परिचय मेळावा २०२६ च्या वधू-वर सूचीचे प्रकाशन सोहळ्याचे आयोजन जळगाव येथे करण्यात आले.**



या वेळी संस्थेचे सर्व पदाधिकारी, सदस्य तसेच आपले कोळी समाज बांधव यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. या कार्यक्रमासाठी नारायण कोळी (मुख्य आयोजक, वधू-वर परिचय मेळावा), प्रा.भाऊसाहेब सुकदेव सोनवणे (प्रचार व प्रसिद्धी प्रमुख वधू- वर परिचय मेळावा २०२६) यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास भारत सरकारच्या आर्मी डिपार्टमेंटमध्ये लेफ्टनंट जयेश संजय तायडे यांची निवड झाली. त्यानिमित्ताने त्यांचा समाजाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी शरद तायडे, नगरसेवक किशोर बाविस्कर, मुकेश सोनवणे, नामदेव सोनवणे, शेखर सोनवणे, अनिता सपकाळे, शोभा कोळी, अॅड.गणेश सोनवणे, छाया कोळी, लिलाधर सोनवणे, योगेश बाविस्कर व समाज बांधव उपस्थित होते.

# विद्यापीठाच्या २९३.५७ कोटींच्या अर्थसंकल्पाला अधिसभेच्या बैठकीत मंजुरी

प्रतिनिधी । जळगाव

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सन २०२६-२७ च्या २९३.५७ कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पाला शनिवार दिनांक १४ मार्च रोजी अधिसभेच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या अर्थसंकल्पात १५.४४ कोटी रूपयांची तूट दर्शविण्यात आली आहे.**

**या आर्थिक वर्षात नवीन पाच महत्वाकांक्षी योजनांना प्रारंभ करण्यात येणार आहे त्यामध्ये डिजिटायझेशन ऑफ स्टूडंट लेझर्स अँड ब्लॉकचेन डिग्री सर्टिफिकेट योजनेसाठी २०० लक्ष एवढी रक्कम राखीव करण्यात आली आहे. आजच्या जागतिक स्पर्धेत कृत्रिम बुद्धिमत्ता हे केवळ तंत्रज्ञान नसून प्रगतीचे मुख्य साधन बनले आहे. खानदेशातील विद्यार्थ्यांना या जागतिक बदलांशी जुळवून घेता यावे यासाठी कुलगुरूंनी कृत्रिम बुद्धिमत्ता, साक्षरता आणि विकास अभियान (विद्यार्थी) ही योजना प्रस्तावित केली असून याकरिता १००. लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.**

कुलगुरू प्रा. व्ही.एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली अधिसभेची बैठक झाली. व्यवस्थापन परिषद सदस्य नितीन झाल्टे यांनी हा अर्थसंकल्प सादर केला. त्यांनी विद्यापीठाच्या विकासाचा आढावा घेत मागील अर्थसंकल्पातील तरतूदींचा मागोवा देखील घेतला. सन २०२५-२६ वा अर्थसंकल्प ३१७.९६ कोटींचा होता. गतवर्षी १७.८७ कोटींची तूट दर्शविण्यात आली होती. विभागवार आढाव्यानंतर सुधारित म्हणून १७.१३ कोटीची तूट सादर करण्यात आली. अर्थसंकल्पाचा फुगवटा कमी करणे हा दृष्टीकोन समोर ठेऊन यावर्षीच्या अर्थसंकल्पात बऱ्याच सुधारणा करण्यात आल्या.

यंदाचा अर्थसंकल्प २९३.५७ कोटी रु. एवढा असून तूट १५.४४ कोटी रु. एवढी आहे. यंदा गतवर्षीच्या तुलनेत तूट १.६९ कोटींनी कमी झाली आहे. या अर्थसंकल्पात परिरक्षणासाठी २१३.९२ कोटी, योजनांतर्गत विकासासाठी ४५.०५ कोटी आणि विशेष कार्यक्रम/योजनांसाठी ३४.६० कोटी तरतूद आहे. २९३.५७ कोटींचा या अर्थ संकल्पात महसूली खर्च म्हणून १८५.९३ कोटी, भांडवली तरतूद २७.९९ कोटी असून योजनांतर्गतचा विकासात्मक बाबींवरील खर्च ४५.५ कोटी असून इतर विशेष कार्यक्रम व योजनांतर्गत मिळणाऱ्या अनुदानांतर्गतचा खर्च म्हणून ३४.६० कोटी दर्शविण्यात आला आहे.

आजच्या डिजिटल युगात शिक्षकांसाठी एआय हे केवळ शिकवण्याचे साधन नसून, ते वैयक्तिकृत शिक्षण, संशोधन आणि मूल्यमापन प्रक्रिया अधिक अचूक करण्यासाठी उपयुक्त आहे. दुसरीकडे, शिक्षकेतर कर्मचारी आणि अधिकाऱ्यांसाठी प्रशासकीय कामांमधील क्लिष्टता कमी करणे, फाईल्सचे व्यवस्थापन आणि डेटा विश्लेषण यामध्ये एआय क्रांती घडवू शकते. विद्यापीठाच्या कामकाजात पारदर्शकता, वेग आणि आधुनिकता आणण्यासाठी कर्मचाऱ्यांच्या तांत्रिक कौशल्यांचे अद्ययावतीकरण करणे आवश्यक आहे. शिक्षकांना मस्मार्ट टीचिंगफ आणि कर्मचाऱ्यांना मस्मार्ट डमिनिस्ट्रेशनफसाठी तयार करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता, साक्षरता आणि विकास अभियान (शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी) योजना सुरू करण्यात येणार असून त्यासाठी रू. २० लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

विज्ञानाचे शिक्षण हे केवळ पुस्तकी ज्ञानावर आधारित नसून प्रयोगांवर अवलंबून असते. मात्र, सध्या अनेक महाविद्यालयांमध्ये प्रयोगशाळा सहाय्यक किंवा कायमस्वरूपी तांत्रिक कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे विज्ञानाचे प्रयोग करून दाखवण्यात अडचणी येत आहेत.

# आयएएस परीक्षेत आकाश त्रिवेदी देशात ७३व्या क्रमांकाने उत्तीर्ण

## रोटरी जळगाव सेंट्रलतर्फे गुणवंतांच्या यशोत्सवाचे आयोजन

प्रतिनिधी । जळगाव

**येथील रोटरी क्लब ऑफ जळगाव सेंट्रलतर्फे आकाश त्रिवेदी हा आयएएस परीक्षेत देश पातळीवर ७३ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्याबद्दल यशोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.**




गणपती नगरातील रोटरी हॉलमध्ये झालेल्या कार्यक्रमास अध्यक्ष जितेंद्र बरडे, मानद सचिव ड. केतन ढाके, आकाशचे वडील ड. ओम त्रिवेदी, आई रेखा त्रिवेदी व भाऊ अभय यांची प्रमुख उपस्थिती होती. स्वप्नांची आकाश भरारी या कार्यक्रमात आकाश त्रिवेदी याने त्याचा प्रवास व यशोगाथा त्याच्या शब्दात व्यक्त केली. त्यात आयआयटी कानपूर येथून कॉम्प्युटर सायन्स शाखेतून बी टेक पूर्ण केले. आयआयएम अहमदाबाद येथे शिक्षण घेत असताना युपीएससी - सीएसई ही परीक्षा देऊन वयाच्या २३ व्या वर्षी देश पातळीवर ७३ व्या क्रमांकाचे यश संपादन केल्याचे सांगितले. आकाशने उद्देश आधारित करिअर करण्याच्या दृष्टीने प्रशासकीय सेवेत वरिष्ठ पदावर जाऊन मूलभूत विकासाचे निर्णय घ्यायची इच्छा आहे असे सांगितले.

भविष्यात असे काही निर्णय ही माझ्या कार्यशैलीची ओळख व्हावी असे वाटते. काहीतरी अर्थपूर्ण असे काम करावे. जिथे मी समाजात योगदान देऊ शकेल समाजाला काहीतरी परत देणे ही माझी जबाबदारी आहे, असेही आकाश याने मत व्यक्त केले. आकाशचे वडील ड. ओम त्रिवेदी यांनी एरंडोल - जळगाव असे अपडाऊन करीत लहानपणापासून आकाशने शिक्षणाची सुरुवात केली असे सांगितले. काशिनाथ पलोड सीबीएससी शाळेतच त्याला संस्कारांचे बाळकडू मिळाले. जंकफूड व व्यसनांपासून तो दूर असून स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा त्याच्यावर प्रभाव आहे. पहाटे उठण्याची सवय व विपश्यना हे त्याचे आवडीचे विषय आहेत. आईकडून योग व ध्यान याचा त्याला वारसा लाभला आहे असेही ते म्हणाले. परिचय दीपक नाथानी यांनी तर आभार डॉ. मिलिंद पाटील यांनी व्यक्त केले. कार्यक्रमास रोटरी जळगाव सेंट्रलच्या सदस्यांची कुटुंबीयांसह मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

